- प्रेस नोट -

दिनांक ०५.०१.२०१९

शंकर हाच्यु राठोड, वय ५४ वर्षे, पोह/५०२, वर्ग-३, नेमणुक पो.स्टे. शिवाजीनगर बीड यांना १०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले.

---

दिनांक ०२/०१/२०१९ रोजी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाचे अधिकारी यांचे समक्ष तक्रार दिली की, तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड येथे दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी तसेच पोह राठोड, पोस्टे शिवाजीनगर बीड यांनी ताब्यात घेतलेली मोटारसायकल, मोबाईल, व पेन ड्राईव्ह परत देण्याकरिता पोह राठोड, पोस्टे शिवाजीनगर बीड हे १०,०००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

त्यावरुन दि.०३/०१/२०१९ रोजी बीड येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता पोह राठोड यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी १०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक ०५/०१/२०१९ रोजी पोह राठोड यांचेविरुध्द दिप हॉस्पीटल,बीड समोर सार्वजनिक रस्त्यावर लाचेचा सापळा आयोजित केला असता पोह राठोड यांना तक्रारदार यांचेकडून त्यांचे कामासाठी १०,०००/- रुपये लाच स्विकारली असता रंगेहात पकडण्यात आले असून लोकसेवक शंकर हाच्यु राठोड, वय ५४ वर्षे, पोह/५०२, वर्ग-३, नेमणुक पो.स्टे. शिवाजीनगर बीड यांचेविरुध्द पोस्टे बीड शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा-१९८८ (सुधारणा २०१८ ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा.श्री.रविंद्र निकाळजे, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि जालना यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आजीनाथ काशिद,पोह/संजय उदगीरकर,पोशि/गंभीर पाटील,संदिप लव्हारे व चालक पोशि प्रविण खंदारे सर्व नेमणुक ला.प्र.वि. जालना युनिट यांनी केली आहे.

याव्दारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| टोल फ्री कमांक | :- १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :- ०२४४२/२२२६४९ |
| मेल आय डी | :- dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- www.facebook.com/MaharashtraACB |

५/१/१९

(बाळकृष्ण हनपुडे पाटील)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.